महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम

मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१८

(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —

(१) ग्रामविकास मंत्री : **"राज्यात जिल्हा परिषदामार्फत राबविलेल्या शासनाच्या अनेक योजनांमधील कोट्यवधी रुपये अडकून असणे"** या विषयावरील प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांच्या दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(२) कामगार मंत्री :

(क) पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे यांचा सन २००७-२००८, २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे पाचवा, सहावा, सातवा, आठवा, नववा, दहावा व अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) पिंपरी चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे अठरावा, एकोणिसावा, विसावा, एकविसावा व बाविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) माल वाहतुक कामगार मंडळ, बृहन्मुंबई यांचा सन २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा

अनुक्रमे चाळीसावा, एकेचाळीसावा, बेचाळीसावा, त्रेचाळीसावा, चौवेचाळीसावा व पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचा सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षांचा अनुक्रमे तेहत्तीसावा व चौतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन २०१६-२०१७ या वर्षांचा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

तीन : लोकलेखा समितीचा एकेचाळीसावा अहवाल सादर करणे.

चार : पंचायती राज समितीचा चौदावा व पंधरावा अहवाल सादर करणे.

पाच : महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा आठवा अहवाल सादर करणे.

सहा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

सात : औचित्याचे मुद्दे.

आठ : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(१) **श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील समुह विकास योजनेच्या माध्यमातून निश्चित करण्यात आलेल्या ४४ विभागामध्ये शास्त्रीनगर, सहकारनगर,लक्ष्मीनगर, चिरागनगर, नळपाडा, सुभाषनगर, जय भवानी नगर या विभागांचा समावेश करण्यात आलेला नसणे, माजिवडा गांव, वाघबीळ गांव, कासारवडवली व भाईंदरपाडा या गावठाण विभागाचा समावेश करताना त्या परिसरामध्ये झोपडया अथवा अनधिकृत बांधकामे नसून जुन्या काळातील आगरी व कोळी बांधवांची मोठमोठी घरे असल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आलेले नसणे, वर्षानुवर्षे झोपडया व अनधिकृत इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या नागरीकांना दिलासा देण्याऐवजी महापालिका प्रशासनाने दोन विभागात निर्माण केलेली

तेढ, त्यानुषंगाने नागरीकांची मागणी लक्षात घेता जो विभाग झोपडपट्टया म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत व ज्यांचे विकास प्रस्ताव एसआरए दफ्तरी दाखल करण्यात आले आहेत असे विकास प्रस्ताव रद्द करुन त्या विभागाचा समावेश समुह विकास योजनेत करण्यात यावा असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाकडे सादर केले असणे, सदर अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर हरकती व सूचना मांडण्याकरीता देण्यात आलेल्या ३० दिवसांच्या कालावधीमध्ये शहरातील महापालिका हद्दीतील सरसकट सर्व झोपडपट्टया व अनधिकृत इमारतींचा समावेश करुन नव्याने यादी जाहीर करण्याची नितांत आवश्यकता, तसेच, आगरी व कोळी लोकांच्या जमीनी महापालिकेने विकास प्रकल्पासाठी घेतलेली असताना त्यांना योग्य मोबदला देवून जुन्या गावठाणांना अधिकृत परवानगी देऊन मुंबई प्रमाणे वाढीव चटई निर्देशांक देण्याची गरज व त्याच बरोबर किमान ८००० मीटरपर्यंतच्या झोपडया अथवा अनधिकृत इमारती एसआरए योजनेच्या माध्यमातून व ८००० मीटरच्या वरच्या झोपडया व अनधिकृत इमारतींच्या संरक्षक समुह विकास योजनेमध्ये समावेश करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **श्री. हर्षवर्धन सपकाळ, ॲड. राहुल कुल, श्री सुरेश गोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षणमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील एक लाख दहा हजार ३१५ शाळांपैकी तीन हजार ३४८ शाळांमध्ये मुलांची तर २०१८ शाळांमध्ये मुलींची शौचालयेच नसणे, उपलब्ध शौचालयापैकी तब्बल सात हजार ६० शाळांमध्ये शौचालये विनावापर पडून असणे, तीन हजार ६५३ शाळांमध्ये मुतारी नसल्याची धक्कादायक बाब माहे मे, २०१८ च्या सुमारास उजेडात येणे, दिव्यांग विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय, तसेच अनेक शाळा, वर्गखोल्या धोकादायक झाल्या असणे, याशिवाय पाणीपुरवठा, स्वच्छतागृह, मोठी दुरुस्ती, किरकोळ दुरुस्ती, संरक्षक भिंत इ. अनेक कामे प्रलंबित असणे, ही कामे जिल्हा परिषदेने निधीची तरतूद करुन तातडीने पूर्ण करावीत अशी मागणी असणे, परंतु शासन याकडे करीत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील विदयार्थ्यांत व पालकवर्गात पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने निधीची तरतूद उपलब्ध करुन देणे, तसेच राज्यातील रिक्त पदे भरण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री अतुल सावे, नारायण कुचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"औरंगाबाद जिल्हयातील शेंद्रा एमआयडीसीला लागून मौजे जयपूर, ता.जि.औरंगाबाद येथे गट क्रमांक २४६ ते २६२ एकूण क्षेत्र २१५ हेक्टर ८० आर जमीन एमआयडीसी साठी जमीन वाटप समितीने जागेचे सर्वेक्षण न करताच भुसंपादनाची परवानगी देणे, सदरील जमीन डोंगराळ व दऱ्या खोऱ्यांची असून उद्योगधंद्यास योग्य

नसणे, संबंधित जमीन बिल्डर ग्रुपची असल्याकारणाने विकासक व अधिकारी यांनी संगनमताने भुसंपादनाचा घाट घालणे, सद्य परिस्थितीत शेंद्रा एमआयडीसी मध्ये मोठया प्रमाणामध्ये भुखंड रिक्त असणे, तसेच एमआयडीसीने विशेष आर्थिक क्षेत्रामधून वगळलेली ५०० एकर जमीन उद्योगासाठी शिल्लक असून ती जमीन उद्योगासाठी वाटप न करता दऱ्याखोऱ्यांमधील जमीन खरेदी करण्यामागचे कारण न समजणे, तसेच दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडोअर (डीएमआयसी) मध्ये ८०० हेक्टर जमीन उपलब्ध असणे, तरीही उद्योगधंद्यांकरिता योग्य नसलेल्या जमीनीकरिता लाखो रुपये खर्च केल्यामुळे शासनाच्या पैशाचा अपव्यय करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात ब-याच ठिकाणी डे-केअर सेंटरच नसल्यामुळे हिमोफेलियाग्रस्त रूग्णांची उपचाराअभावी होत असलेली परवड, महाराष्ट्रामध्ये हजारो हिमोफेलियाग्रस्त रूग्ण असणे, राज्य शासनाने तसेच केंद्र शासनाने हिमोफेलिया या आजाराचा दिव्यांग गटामध्ये समावेश केलेला असून रूग्णांना लागणारी औषधे विविध केंद्रावर मोफत देण्याचा घेतलेला निर्णय, मात्र काही वर्षापासून औषधांची खरेदीच योग्य रितीने होत नसणे, या आजारावरील औषधे अल्प प्रमाणात तीही विलंबाने उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण भागातील रूग्णांवर जीव गमावण्याची आलेली वेळ, ग्रामीण भागातील रूग्ण शेजारील राज्यात औषधोपचारासाठी जात असूनही महाराष्ट्र राज्यामध्ये मात्र औषध खरेदी वेळेवर व आवश्यक त्या प्रमाणात होत नसणे, औरंगाबाद जिल्ह्यातील हिमोफेलियाग्रस्त पाच वर्षीय अनिकेत छबीलदास शिरसे या बालकावर पंढरपूर (जि.सोलापूर) येथे खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करून हिमोफेलिया सोसायटी, औरंगाबाद च्या वतीने अनिकेतवर उपचार केलेले असणे, परंतु दिनांक २९ एप्रिल, २०१८ रोजी रात्री अनिकेतच्या नाकातोंडातून अचानक रक्तस्त्राव सुरु होणे, त्यास फॅक्टर-७ हा डोस देणे आवश्यक असूनही हा डोस पंढरपूर येथे उपलब्ध नसणे, अहमदनगर येथे सुद्धा हा डोस उपलब्ध नसल्याने मुंबईला घेऊन जात असताना वाटेतच रुग्णाचा मृत्यु झाल्याची घटना घडणे, हिमोफेलियाग्रस्त रूग्णांना रक्तस्त्राव थांबविणेकरिता विविध प्रकारच्या फॅक्टर (डोस) ची किंमत १५ हजारापासून ते दिड लाख रूपयांपर्यंत असल्यामुळे उपचार घेणाऱ्या रूग्णांना या आजारावर मोठा खर्च करावा लागणे, हिमोफेलियाग्रस्त रूग्णांना जवळच्या शहरातच औषधोपचार मिळावा याकरिता डे- केअर सेंटर सुरु करण्याची स्थानिकांनी वारंवार केलेली मागणी, जिल्हा सामान्य रूग्णालयात डे-केअर सेंटर सुरू करणेस मंजूरी देवूनही शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला नसणे, त्यामुळे हिमोफेलियाग्रस्त रूग्णांना उपचारासाठी मुंबई किंवा पुणे येथे जावे लागणे, वेळेत औषधे न मिळाल्यामुळे या रूग्णांचा मृत्यू झाल्याच्या घडलेल्या घटना, या सर्व बाबीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यामुळे नागरिकांच्या मनात पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही

व प्रतिक्रिया."

नऊ : शासकीय विधेयके :

(अ) पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ — महाराष्ट्र भूमिगत नळमार्ग व भूमिगत वाहिन्या (जमिनीमधील वापर हक्काचे संपादन) विधेयक, २०१८.

(२) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ — श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) विधेयक, २०१८.

(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री.दिलीप वळसे पाटील, अजित पवार, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंतराव चव्हाण, शेख आसिफ शेख रशीद, अमिन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबु आझमी, पृथ्वीराज चव्हाण, हर्षवर्धन सपकाळ, सुरेश लाड, हनुमंत डोळस, भास्कर जाधव, संजय कदम, दत्तात्रय भरणे, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, संदीप नाईक, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, राहुल जगताप, दिपक चव्हाण, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, वैभव पिचड, विजय भांबळे, प्रदीप जाधव (नाईक), राजेश टोपे, जयंत पाटील, श्रीमती दीपिका चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंतराव चव्हाण, शेख आसिफ शेख रशीद, अमिन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबु आझमी, छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील,**

अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री छगन भुजबळ, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंतराव चव्हाण, शेख आसिफ शेख रशीद, अमिन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबु आझमी, छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, बसवराज पाटील, अमिन पटेल, डी.पी.सावंत, वसंतराव चव्हाण, संतोष टारफे, शेख आसिफ शेख रशीद, कुणाल पाटील, ॲड. त्र्यंबकराव भिसे, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे. "

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री जयकुमार गोरे, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ — महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ — महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ — महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ — महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.जयकुमार गोरे, संग्राम थोपटे, अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ — महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ — महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(५) (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, कुणाल पाटील, वसंतराव चव्हाण, त्र्यंबकराव भिसे, डी. पी सावंत, अमिन पटेल, संग्राम थोपटे, अमर काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अमित झनक, संग्राम थोपटे, हर्षवर्धन सपकाळ, जयकुमार गोरे, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(६) (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, बसवराज पाटील, अमिन पटेल, डी.पी.सावंत, वसंतराव चव्हाण, संतोष टारफे, कुणाल पाटील, त्र्यंबकराव भिसे, राहुल बोंद्रे, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी

(सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(७) (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, बसवराज पाटील, अमिन पटेल, डी.पी.सावंत, वसंतराव चव्हाण, संतोष टारफे, कुणाल पाटील, त्र्यंबकराव भिसे, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त

सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० – महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री अमित झनक, राहुल बोंद्रे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० – महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

दहा : सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, मो.आरिफ नसिम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकराव चव्हाण, डॉ.सतिश पाटील, सर्वश्री अमिन पटेल, डी. एस. अहिरे, राहुल मोटे, डी. पी. सावंत, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, भारत भालके, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम थोपटे, रणजित कांबळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री प्रदिप जाधव-नाईक, कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशीराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, अमर

काळे, अमित झनक, कु.प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, नितेश राणे, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, विश्वजीत कदम, संदिप नाईक, बबनराव शिंदे, दिपक चव्हाण, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)

"राज्यात पेट्रोल व डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत असून मागील चार वर्षात इंधनाच्या दराने उच्चांक गाठणे, एस.टी. प्रवासी भाड्यातही दरवाढ करावी लागल्यामुळे ग्रामीण प्रवाशांमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण, सदरची दरवाढ ही महागाईला चालना देणारी असणे, राज्यातील सर्वसामान्य जनतेला महागाईमुळे बसलेली झळ, घरगुती गॅसच्या दरात वाढ केल्याने महिलांचे आर्थिक नियोजन कोलमडणे, पेट्रोल व डिझेलला वस्तू आणि सेवा कराच्या कक्षेत आणण्यासाठी राज्याकडून प्रस्ताव पाठविण्यास सांगण्यात येऊनही त्याची अंमलबजावणी न होणे, जीएसटीच्या करप्रणालीतून सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या राज्य सरकारवरील कर्जाचा डोंगर दिवसेंदिवस वाढत असून त्यातच सरकारी महामंडळांना तब्बल २५ हजार ६४० कोटी रुपयांचा झालेला तोटा, राज्य सरकारच्या तिजोरीवर तब्बल ४ लाख ६२ हजार कोटी रुपयांचे कर्ज असताना पुन्हा ४२ हजार कोटींचे कर्ज काढण्याची केंद्राकडून मागितलेली परवानगी, त्यातच १ लाख कोटी रुपये खर्चाच्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनमुळे कर्जाचे ओझे वाढणे, सदर कर्जाची परतफेड येनच्या स्वरुपात करण्याबाबत जपानबरोबर झालेला करार, शासनाच्या विविध विभागात २ लाखाच्या वर रिक्त पदे असूनही ती न भरल्यामुळे विकासाच्या योजनांवर होणारा परिणाम, बेरोजगार, कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणीकृत बेरोजगारांच्या संख्येत होणारी वाढ, "इज ऑफ डुईंग बिझनेस" मध्ये राज्य तेराव्या क्रमांकावर जाणे, स्टार्ट-अप इंडियामध्ये महाराष्ट्राची झालेली पिछेहाट, राज्यातील कायदा व सुव्यवस्था हाताबाहेर गेली असून खून, दरोडे, चोरी, बलात्कार, महिलांच्या विनयभंगाच्या घटनांमध्ये झालेली वाढ, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन सायबर गुन्हेगारीच्या माध्यमातून जनतेची होत असलेली फसवणुक, आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होऊन महिला व मुला-मुलींच्या अपहरणाचे वाढत असलेले प्रकार, पोलिसांच्या निवासस्थानांची झालेली दूरवस्था, पोलिसांना होणाऱ्या मारहाणीच्या घटनांमध्ये वाढ, अमली पदार्थाच्या माध्यमातून तरुण पिढी व्यसनाधिन होणे, रस्त्यावरील अपघातांना पायबंद घालण्यात अपयश आले असून रस्ते सुरक्षा अभियान राबविण्यात झालेली दिरंगाई, दिनांक ११ मे, २०१८ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या पूर्वनियोजित दंगल प्रकरणी पोलिसांनी घेतलेली बघ्याची भूमिका, दंगलीकरिता फ्लीप कार्टवर मागविलेली शस्त्रे, याकरिता फ्लीप कार्टवर बंदी घालण्याची आवश्यकता, राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यामध्ये होत असलेला भ्रष्टाचार, पोलीस भरतीत होत असलेले घोटाळे, सोशल मिडीयाद्वारे पसरविल्या जाणाऱ्या अफवांवर निर्बंध घालण्यास अपयश आल्याने साक्रीसह राज्यात विविध ठिकाणी वारंवार निरपराध लोकांचे जाणारे बळी, मागील तीन वर्षात मंत्री व अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणूनही त्यांच्या चौकशीमध्ये केली जाणारी दिरंगाई अथवा

चौकशीच न करणे, वाकडी (ता.जामनेर, जि.जळगाव) येथील दलित अल्पवयीन मुलांना करण्यात आलेली अमानुष मारहाण व त्यांची काढण्यात आलेली नग्न धिंड, भीमा-कोरेगांव दंगलीप्रकरणी मुख्य सुत्रधार मोकाट फिरत असून सामान्य नागरिकांना आरोपी म्हणून अटक करुन वेगळे चित्र निर्माण करण्याचा होत असलेला प्रयत्न, डॉ. दाभोळकर व कॉ. पानसरे यांचे मारेकरी शोधण्यात सरकारला अपयश आल्यामुळे न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त करणे, नक्षलवाद्यांशी जोडून चळवळीतील कार्यकर्त्यांची करण्यात येणारी बदनामी, याप्रकरणी शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

अकरा : डॉ.अनिल बोंडे, सर्वश्री सुभाष साबणे, समीर कुणावार, सुनिल प्रभू, राजेंद्र पाटणी, प्रकाश आबिटकर, डॉ.संजय कुटे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री चरण वाघमारे, शंभुराज देसाई, उन्मेष पाटील, डॉ.शशिकांत खेडेकर, डॉ.सुनिल देशमुख, डॉ.संजय रायमुलकर, सर्वश्री बाबुराव पाचर्णे, राजाभाऊ वाजे, प्रशांत बंब, किशोर पाटील, ॲड. संजय धोटे, सर्वश्री चंद्रदीप नरके, हरिष पिंपळे, ज्ञानराज चौगुले, डॉ.पंकज भोयर, सर्वश्री सुरेश धानोरकर, संजीवरेड्डी बोदकुरवार, अनिल बाबर, कीर्तीकुमार ऊर्फ बंटी भांगडिया, सदानंद चव्हाण, प्रा.डॉ.अशोक उईके, सर्वश्री वैभव नाईक, तान्हाजी मुटकुळे, समीर मेघे, बाळासाहेब मुरकुटे, जगदीश मुळीक, विजय रहांगडाले, रणधीर सावरकर, संजय सावकारे, डी.मल्लिकार्जुन रेड्डी, शिवाजीराव नाईक, बाळासाहेब सानप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"राज्यात केंद्र शासनाच्या शिफारशीनूसार १४ प्रमुख पिकांकरिता उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव जाहीर केल्याने शेतकऱ्यांच्या मनात शासनाबद्दल विश्वास निर्माण झालेला असणे, शेतकऱ्यांची जमिन सिंचित करण्याकरिता पंतप्रधान सिंचन योजनेबरोबरच बळीराजा जलसंजीवनी योजना राज्यात प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात येणे, शेतकऱ्यांना युरिया, मिश्र खते, सेंद्रीय खते, बियाणे यांचा योग्य दरात नियमित पुरवठा होत असणे, अल्पभूधारक शेतकऱ्यांना मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड योजनेसोबतच बहुभूधारक शेतकऱ्यांकरिता भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना कार्यान्वित करण्यात येणे, सदरहू योजनेमध्ये शेतकऱ्यांना १००% ठिबक सिंचनासह व अनुदानासह रोपे, कलम इ. पुरवठा करण्यात येणे, व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या शेतीला लागू करण्यात आलेल्या अनुदानीत कुंपण योजनेच्या धर्तीवर अन्य वनालगतच्या शेतीलाही वन्य प्राण्यांपासून संरक्षणाकरिता अनुदानीत कुंपण योजना लागू करण्याची आवश्यकता असणे, धडक सिंचन विहिरी, मागेल त्याला शेततळे, मनरेगा अंतर्गत विहिरी, ठिबक सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरण, प्रात्यक्षिक बियाणे पुरवठा योजना यांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, गट शेतीला देण्यात आलेल्या प्रोत्साहनामुळे शेतकऱ्यांची पणन व विक्री प्रक्रिया गट कंपनीद्वारे यशस्वीपणे राबविण्यात येणे, तूर, चना, ज्वारी, मका इ. शेतमालाची हमीभावाने खरेदी करण्यात येणे,

भूमीधारी शेतकऱ्यांची वर्ग-२ ची जमिन वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याचा व त्यायोगे राज्यातील गोरगरीब शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, कृषीपंप जोडणीच्या सन २०१७ पर्यंतच्या अर्जांचा निपटारा करण्यात येणे, शेतकऱ्यांचे कृषीपंपाचे विज देयके प्रलंबित असताना सुध्दा त्यांचा विज पुरवठा खंडीत न करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना देण्यात आलेला दिलासा, यवतमाळ जिल्ह्यात किटकनाशकांचा प्रादुर्भाव होऊन झालेल्या शेतकऱ्यांच्या बळींची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून करावयाची उपाययोजना, गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अल्पकालावधीमध्ये देण्यात आलेली मदत, बोंडअळी, तुडतुडेग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात आलेली मदत इ. बाबी विचारात घेऊन राज्यातील शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

बारा : सर्वश्री सुनिल प्रभु, राजेंद्र पाटणी, संजय रायमुलकर, ॲड.आशिष शेलार, श्री.सदा सरवणकर, ॲड.राज पुरोहित, डॉ.शशिकांत खेडेकर, डॉ.अनिल बोंडे, सर्वश्री अजय चौधरी, सुरेश धानोरकर, डॉ.संजय कुटे, सर्वश्री सुनिल शिंदे, अतुल भातखळकर, समीर कुणावार, मंगेश कुडाळकर, ॲड.पराग अळवणी, सर्वश्री सुधाकर देशमुख, प्रकाश फातर्पेकर, डॉ.सुनिल देशमुख, डॉ.सुधाकर भालेराव, श्रीमती तृप्ती सावंत, श्री.संतोष दानवे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री राम कदम, प्रशांत बंब, अमित साटम, सुनिल राऊत, मंगलप्रभात लोढा, अशोक पाटील, रणधीर सावरकर, प्रकाश सुर्वे, योगेश सागर, पंकज भोयर, किशोर पाटील, राजन साळवी, सदानंद चव्हाण, अनिल गोटे, संजय केळकर, भरतशेठ गोगावले, प्रताप सरनाईक, उन्मेश पाटील, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, श्री.बाळासाहेब सानप, डॉ.राहुल आहेर, ॲड.राहुल कुल, श्री.तानाजी मुटकुळे, प्रा.संगिता ठोंबरे, सर्वश्री तुकाराम काते, सुधाकर कोहळे, सुभाष साबणे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री विकास कुंभारे, ज्ञानराज चौघुले, अतुल सावे, राजेंद्र नजरधने, चरण वाघमारे, रमेश लटके, नरेंद्र पवार, कॅ.आर तमिल सेल्वन, सर्वश्री जगदीश मुळीक, नरेंद्र मेहता, आर.टी.देशमुख, राजू तोडसाम, ॲड.लक्ष्मण पवार, सर्वश्री हेमंत पाटील, हरिभाऊ जावळे, संजय सावकारे, डॉ.देवराव होळी, डॉ.मिलिंद माने, सर्वश्री सुधीर पारवे, कृष्णा गजबे, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्री मनोहर भोईर, वैभव नाईक, राजाभाऊ वाजे, अनिल कदम, डॉ. बालाजी किणीकर, प्रा.अशोक उईके, सर्वश्री डी.मल्लिकार्जुन रेड्डी, संजीवरेड्डी बोदकुरवार, रमेश बुंदिले, गणपत गायकवाड, किर्तीकुमार भांगडिया, किसन कथोरे, प्रभुदास भिलावेकर, राजेश काशीवार, ॲड.रामचंद्र अवसरे, सर्वश्री समीर मेघे, विजय रहांगडाळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"विदर्भ, मराठवाडा, खान्देश, कोकण विभागातील ग्रामीण भागात राहणा-या व्यक्तींना पंतप्रधान आवास योजनेतंर्गत रास्त भावात जमिनी देण्याची योजना आखून ही योजना सक्षमपणे राबविण्याची आवश्यकता, विदर्भ-मराठवाड्यात कृषी आधारीत प्रक्रिया उद्योगाला विशेष सवलती देऊन उद्योग निर्मितीला चालना देण्याची आवश्यकता, नागपूर हे

उपराजधानीचे शहर असूनही येथील नागरिकांना विशेष आजारासाठी मुंबईतील रुग्णालयांवर अवलंबून रहावे लागणे, ही अवस्था दूर करण्याच्या दृष्टीने विदर्भ, मराठवाड्यात सुपरस्पेशालिटी रुग्णालये निर्माण करण्याची आवश्यकता, विदर्भ, मराठवाड्यातील ग्रामीण युवकांना मुंबई, पुणे यासारख्या शहरांत जाण्यापासून प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती व पुनर्विकास करणे, घरमालकांच्या अडवणुकीमुळे व म्हाडाच्या निष्क्रीयतेमुळे शक्य नसणे, परिणामी जुन्या चाळीत पिढ्यान्-पिढ्या राहणा-या मूळ मुंबईकरांचे जीवन धोक्यात असणे, विस्थापित होणा-या रहिवाशांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची मागणी, महानगरपालिकेच्या भूखंडावरील अनेक इमारतींचे लीज संपले असल्याने लीजचे नुतनीकरण करण्याचे धोरण महानगरपालिकेने तातडीने राबविण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही, ६० वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून शासनाच्या जमिनीवर वास्तव्य करीत असलेल्या रहिवाशांच्या जमिनी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये नोंद करण्याची मागणी, आशिया खंडातील सर्वात मोठ्या धारावी येथील झोपडपट्टीचा व इतर झोपडपट्टयांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने घेतलेला महत्त्वाकांक्षी निर्णय, संक्रमण शिबीरांची दुरवस्था व यामध्ये बांग्लादेशी नागरिकांची झालेली घुसखोरी, बंद पडलेल्या गिरण्यांमधील कामगार, बीडीडी चाळीतील रहिवाशी व मेट्रोमुळे बाधीत रहिवाशांना देण्यात येणा-या ५०० चौ.फुटाच्या घरांच्या धर्तीवर मुंबईत जुन्या व सेस इमारतीमध्ये राहणा-या भाडेकरूंनाही ५०० चौ.फुटांची घरे देण्याची आवश्यकता, मुंबईतील ५०० ते ७०० चौ.फुट क्षेत्रफळाच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्याबाबत व त्यावरील क्षेत्रफळाच्या घरांना मालमत्ता करात सवलत देण्याबाबतच्या प्रलंबित प्रस्तावावर तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, मुंबईतील पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत ६६ इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील शासकीय कर्मचारी, पोलीस कर्मचारी इ. च्या निवासस्थानांची दुरवस्था तातडीने दूर करण्याची आवश्यकता, शासकीय वसाहतीतील घरे मालकी हक्काने देण्याबाबतची कर्मचा-यांची प्रलंबित मागणी, मुंबई शहरासाठी गृहनिर्माण धोरण ठरविण्याबाबत नेमलेल्या आमदारांच्या समितीने दिलेल्या अहवालाची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

तेरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(मंगळवार, दिनांक १० जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (अनुक्रमांक १ व २)

(१) **श्री. अस्लम शेख, वि.स.स.**

"पालघर जिल्ह्यातील आदिवासींनी भूसंपादनाविरोधात काढलेल्या मोर्चाबाबत" या विषयावरील श्री. विलास तरे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न

क्रमांक ११३६३८ ला दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री. सुनिल प्रभु, वि.स.स.**

"पवई (मुंबई) येथील हिरानंदानी या विकासकाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याच्या अटींचे उल्लंघन करून गैरव्यवहार केल्याबाबत" या विषयावरील श्री. सुनिल प्रभु, वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०९२४४ ला दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (अनुक्रमांक ३ व ४)

(३) **श्री. सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स.**

"बागमळागाव (ता.देवगड, जि.सिंधुदूर्ग) येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या बांधकामाबाबत" या विषयावरील श्री.नितेश राणे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११६६७६ ला दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(४) **श्री.विजय काळे, वि.स.स.**

"नागपूर व पुणे प्रादेशिक मनोरूग्णालयात मनोरूग्णांचे झालेले मृत्यू" या विषयावरील डॉ.मिलिंद माने व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११७२०० ला दिनांक ०९ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
नागपूर,
दिनांक : १६ जुलै, २०१८

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.